सायं दैनिक

नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ३६ • शुक्रवार दि.३० ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

बद्रीनाथहून परतणारे हेलिकॉप्टर बेपत्ता;६ जणांचा शोध सुरु!

खराब हवामानामुळे बचावकार्यात अडथळे

देहरादून:उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात बद्रीनाथहून परतणारे सहा जणांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर अचानक बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. जोशीमठ जवळील हाथी पहाडाच्या मागे असलेल्या चाई गाव परिसरात हेलिकॉप्टर कोसळल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, हेलिकॉप्टरचे अवशेष अद्याप आढळलेले नाहीत. स्थानिक प्रशासन, पोलीस, लष्कर आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची पथके शोध व बचावकार्यासाठी रवाना झाली आहेत.

ट्रान्स भारत कंपनीचे हे हेलिकॉप्टर बद्रीनाथहून परतत असताना त्याचे स्थान अचानक नोंदणी यंत्रणेवरून गायब झाले. त्यानंतर शोध मोहीम सुरू करण्यात आली. हेलिकॉप्टरमध्ये पाच प्रवासी आणि एक वैमानिक असे एकूण सहा जण होते. प्रवाशांमध्ये चंद्रकांत, राजश्री, दिनेश, आकाश आणि अथर्व यांचा समावेश असून हिमांशू हे हेलिकॉप्टर चालवत होते.अपघातग्रस्त परिसरात मुसळधार पाऊस आणि दाट ढगांमुळे दृश्यमानता कमी झाली आहे. त्यामुळे शोधकार्यात अडथळे निर्माण होत आहेत. दोन अन्य हेलिकॉप्टरच्या मदतीनेही शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बद्रीनाथ आणि जोशीमठ दरम्यानचा परिसर पथकांकडून तपासला जात आहे. जोशीमठचे उपविभागीय अधिकारी चंद्रशेखर वशिष्ठ यांनी हेलिकॉप्टर अपघाताची माहिती मिळाल्याचे सांगितले. परिसरात काही संशयास्पद वस्तू आढळल्याने हेलिकॉप्टर कोसळल्याची शक्यता व्यक्त होत आहे. लष्कर, पोलीस, राज्य आपत्ती प्रतिसाद दल आणि आरोग्य विभागाची पथके घटनास्थळी दाखल होत आहेत.दरम्यान, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. जिल्हा प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माध्यमातून बचावकार्य सुरू असून संपूर्ण परिस्थितीवर आपण लक्ष ठेवून असल्याचे त्यांनी समाज माध्यमांवरील संदेशातून स्पष्ट केले. जखमी आढळल्यास त्यांना तातडीने हवाई मार्गाने मोठ्या रुग्णालयात हलविण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत. हेलिकॉप्टर मधील सर्व प्रवासी सुखरूप असावेत, अशी प्रार्थना त्यांनी व्यक्त केली आहे. हेलिकॉप्टरचा ठावठिकाणा आणि त्यातील सहा जणांची स्थिती अद्याप स्पष्ट झालेली नसून शोधमोहिमेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गुन्हेगारांच्या पाच टोळीतील १६ जण तडीपार

पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांची कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील गुन्हेगारीवर आळा बसविण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणे सुरु केले आहे. गुन्हेगारांच्या पाच टोळीतील सोळा जणांना नांदेड जिल्ह्यातून एक व दोन वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे.

सामान्य नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणे, अवैध व्यवसाय सुरु करणे तसेच गंभीर गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांच्या टोळी विरुध्द जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी कडक पाऊले उचलली आहेत. पोलीस अधिकाऱ्यांनी पाठविलेल्या वेगवेगळ्या पाच प्रस्तावामधून सोळा गुन्हेगारांना नांदेड जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले. भाग्यनगर पोलीस स्टेशन हद्दीत गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीतील नितुल विनोद चव्हाण (वय ३९), रा.निळा रोड, श्यामनगर, नांदेड, ऋषीकेश उर्फ वेणु अरुण कांबळे (वय ३२) रा.सिध्दार्थनगर, नांदेड, शेख इस्माईल शेख मुनीर (वय ३३) रा.आसरानगर, नांदेड, अनवर अलीखान अकबर अलीखान (वय ३५) रा.खडकपूरा,नांदेड, धम्मदीप संभाजी थोरात (वय ३४) रा. प्रभातनगर, नांदेड, मन्मथ पिल्या स्वामी (वय ३२) रा.वैभवनगर या सहा जणांना एका वर्षासाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. तसेच अक्षय केशव पांढरे (वय २१) रा.पालीनगर व विशाल सिध्दार्थ गायकवाड (वय २२) रा.शंकरनगर, नांदेड या दोन सराईत गुन्हेगारांवरही भाग्यनगर पोलीसांनी पाठवलेल्या प्रस्तावावरुन पोलीस अधिक्षकांनी एका वर्षासाठी हद्दपारीची कारवाई केली आहे. इतवारा पोलीस ठाण्या हद्दीतील मुकेश उर्फ

पान ४ वर

मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील जनभियोग

विरोधकांचे उद्या दिल्लीत शक्तीप्रदर्शन

नवी दिल्ली: मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात शुक्रवारी (३० ऑक्टोबर) आयोजित करण्यात आलेला जनभियोग कार्यक्रम दिल्लीतील खराब हवामानामुळे एक दिवस पुढे ढकलण्यात आला आहे. आता हा कार्यक्रम शनिवारी (३१ ऑक्टोबर) नियोजित वेळेतच होणार असल्याची माहिती विरोधी पक्षांच्या नेत्यांनी दिली. कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला असला तरी विरोधक आंदोलनावर ठाम असून इंडिया आघाडीतील पक्ष एकजुटीने या लढ्यात सहभागी होणार आहेत.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात संपूर्ण विरोधक एकत्र असल्याचे स्पष्ट केले. विविध ठिकाणी सुरू असलेली आंदोलने ही एकाच व्यापक आंदोलनाचा भाग आहेत. विरोधी नेत्यांना दिल्लीत पोहोचण्यापासून रोखले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. हा कार्यक्रम रद्द झालेला नसून केवळ एक दिवस पुढे ढकलण्यात आला आहे. उद्या त्याच वेळेला कार्यक्रम होणार असून विरोधक माघार घेणार नाहीत, असे त्यांनी ठामपणे सांगितले.तृणमूल काँग्रेसचे नेते डेरेक ओब्रायन यांनीही इंडिया आघाडीच्या एकजुटीचा विश्वास व्यक्त केला. विरोधक या लढ्यात एकत्र असून त्यांना निश्चितच यश मिळेल, असा दावा त्यांनी केला.समाजवादी पक्षाचे नेते धर्मेंद्र यादव यांनी भाजपवर टीका करत अनेक जागा संशयास्पद मार्गांनी जिंकल्याचा आरोप केला. तसेच उद्याच्या कार्यक्रमात समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव सहभागी होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, कार्यक्रमाची तारीख बदलली असली तरी विरोधकांच्या आंदोलनाची दिशा आणि रणनीती कायम असल्याचे त्यांच्या नेत्यांच्या विधानांवरून स्पष्ट होत आहे.

शेतकऱ्यांनी कालव्याच्या पाण्यावर रब्बी पिकांची पेरणी करू नये; जलसंपदा विभागाचे आवाहन

नांदेड/प्रतिनिधी-अपुऱ्या पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा सन २०२६-२७ या वर्षासाठी ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करण्यात आला आहे. त्यामुळे चालू वर्षात प्रकल्पाच्या कालव्याद्वारे रब्बी हंगामासाठी सिंचनाचे पाणी उपलब्ध करून देणे शक्य होणार नाही. शेतकऱ्यांनी कालव्याच्या पाण्यावर अवलंबून राहून रब्बी पिकांची पेरणी किंवा लागवड करू नये, असे आवाहन नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर) यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने ५ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार विष्णुपुरी प्रकल्पातील सर्व पाणीसाठ्यातून उपलब्ध होणारे पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांनी नांदेड महानगरपालिका तसेच ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठी या प्रकल्पातील पाणी आरक्षित ठेवले आहे.या निर्णयामुळे सन २०२६-२७ मध्ये विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालव्याद्वारे रब्बी हंगामातील पिकांना सिंचनासाठी पाणी सोडणे शक्य होणार नाही. त्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी कालव्याद्वारे प्रवाही पाणी उपलब्ध होईल, या अपेक्षेने रब्बी पिकांची पेरणी, लागवड अथवा अन्य पीक उत्पादनाची कामे करू नयेत. कालव्याच्या पाण्याच्या अपेक्षेने पीक पेरणी किंवा लागवड केल्यास होणाऱ्या संभाव्य नुकसानीची जबाबदारी जलसंपदा विभागाची राहणार नाही, असेही विभागाने स्पष्ट केले आहे.दुष्काळसदृश परिस्थितीत उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करणे आणि नागरिकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन विष्णुपुरी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सर्व शेतकरी बांधवांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून जलसंपदा विभागास सहकार्य करावे, असे आवाहन नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर) चे कार्यकारी अभियंता सी. आर. बनसोड यांनी सार्वजनिक निवेदनाद्वारे केले आहे.

आ.संजय गायकवाडांवर निलंबनाची चर्चा;लगेचच घूमजाव

मुंबई/प्रतिनिधी-शेतकरी आत्महत्यांबाबत अवमान-कारक वक्तव्य केल्याने बुलढाण्याचे शिवसेना आमदार संजय गायकवाड अडचणीत आले आहेत. त्यांच्या वक्तव्यावरून राज्यभरातून संताप व्यक्त होत असून विरोधकांनीही सरकारवर टीका केली आहे. या प्रकरणाची उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी गंभीर दखल घेतल्याची चर्चा असून, पक्षाची प्रतिमा मलीन होत असल्याने गायकवाड यांच्यावर निलंबनाची कारवाई होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

याच दरम्यान आपण हे वक्तव्य अंमली पदार्थांच्या आहरी गेलेल्या तरुण पिढीसाठी केल्याचा घुमजाव आ. गायकवाड यांनी केला आहे.

आमदार गायकवाड यांनी शेतकरी आत्महत्या करणाऱ्यांच्या अंत्यसंस्काराला कोणीही जाऊ नये, असे वादग्रस्त विधान केले होते. शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याऐवजी आपल्या अडचणी लोकप्रतिनिधींना सांगाव्यात, असेही त्यांनी म्हटले होते. या वक्तव्याचा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी निषेध करीत सरकारने तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, कारवाईच्या चर्चेनंतर गायकवाड यांनी आपल्या वक्तव्यावरून घूमजाव केले आहे. आपण शेतकऱ्यांबाबत नव्हे, तर अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या तरुण आणि प्रेमभंगातून आत्महत्या करणाऱ्या व्यक्तींबाबत बोललो होतो, असा खुलासा त्यांनी केला.

सोनाईनगर येथील कुंटणखान्यावर पोलीसांची धाड; सहा जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील सोनाईनगर भागातील एका अपार्टमेंटमध्ये सुरु असलेल्या कुंटणखान्यावर गुरुवारी पोलीसांनी धाड टाकुन कुंटणखाना चालविणाऱ्या एका महिलेसह सहा जणांना अटक केली.

सोनाईनगर भागातील शिवसाई अपार्टमेंटमध्ये कुंटणखाना सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या आदेशावरुन पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वैंजने यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले, भाग्यनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक संतोष तांबे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने एक बनावट फंटर तयार करुन शिवसाई अपार्टमेंटमध्ये पाठविण्यात आला. त्याने इशारा करताच पोलीसाच्या पथकाने पंचासमक्ष शिवसाई अपार्टमधील एका फ्लॅटवर छापा टाकला. पोलीसांनी रणजितकौर अजय तिवारी (वय ५०) रा. सोनाईनगर, नांदेड, धरमसिंग महेंद्रसिंग अलग (वय ३१) रा. सोनाईनगर,नांदेड, दत्ताहरी उमरे (वय ४०) रा.विद्युतनगर, नांदेड, आशिष साहेबराव किर्तने (वय २५) रा.सर्वोदयनगर, नांदेड, मनोज नामदेव सूर्यवंशी (वय २२) रा.चैतन्यनगर, नांदेड,

पान ४ वर

वाडी बु.येथील उपजिल्हा रुग्णालयाचे रविवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

नांदेड/प्रतिनिधी-वाडी बु. येथे नव्याने बांधण्यात आलेल्या उपजिल्हा रुग्णालयाचे लोकार्पण शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती शिवसेनेचे विधानपरिषदेचे गटनेते आ.हेमंत पाटील यांनी आज पत्रकार परिषदेत बोलतांना दिली आहे.

राज्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली असून अत्यंत साध्या पध्दतीने उपजिल्हा रुग्णालयाचा लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी जवळपास २० ते २५ हजार जनसमुदाय उपस्थित राहील यासाठी शिवसेनेकडून जय्यत तयारी सुरु आहे. शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक घेण्यात आली. वाडी बु.येथील नुतन ग्रामीण रुग्णालयाचा नांदेड उत्तर व परिसरातील नागरिकांना फायदा होणार आहे. या रुग्णालयात नागरिकांना आरोग्याविषयी वेगवेगळ्या सुविधा मिळणार असून तज्ञ डॉक्टरही कार्यरत राहणार आहेत. रुग्णालयाच्या लोकार्पण कार्यक्रमाविषयी वाडी बु. येथील नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. ती नाराजी दुर करण्यात आली असून वाडी भागातील नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असल्याचे आ.हेमंत पाटील यांनी सांगितले. नांदेड शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून कठोर पाऊले उचलण्याची गरज आहे. या संदर्भात आपण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. के.एफ.इंटरप्रायजेस व कुबेरफल पतसंस्थेच्या उद्घाटन कार्यक्रमाला कोणते राजकीय पदाधिकारी व शासकीय अधिकारी उपस्थित होते. हे सर्वांनाच माहित असून खासगी फायनान्सच्या कार्यालयावर कोणाचे फलक होते याचे व्हिडीओ समाजमाध्यमावर व्हायरल होत असल्याचे त्यांनी सांगितले.

नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी

पान ४ वर

रुग्णालयाला कै.बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याची मागणी

वाडी बु.येथील उपजिल्हा रुग्णालयाला हिंदू हृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याची मागणी शिवसैनिकांनी केली असल्याची माहिती आ.हेमंत पाटील यांनी दिली. नांदेड शहर व जिल्ह्यातील अनेक संस्थांना आपल्या पूर्वजांचे नाव देण्याची प्रथा राजकीय नेत्यांनी अनेक वर्षांपासून सुरु केल्याचा आरोप आ.पाटील यांनी केला. हिंदूत्वाचे ज्वलंत विचार जनसामान्यांपर्यंत पोहचविणारे दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचे नाव रुग्णालयाला देण्याची मागणी शिवसैनिकांनी केली. पद्मश्री कै.श्यामराव कदम यांच्या नावाला आमचा विरोध नाही. त्यांनी सहकार क्षेत्रात केलेले कार्य खूप मोठे आहे. त्यांच्यामुळेच ग्रामीण भागातील अनेक तरुणांना रोजगार मिळालेला आहे. यासंदर्भात आता वरिष्ठ नेते निर्णय घेतील असे आ.हेमंत पाटील यांनी स्पष्ट केले.

महायुतीत मिठाचा खडा!

राजकारणात विजयाची मालिका सुरू असली की, आत्मविश्वासाचे रूपांतर अनेकदा अहंकारात होते. सत्तेची ताकद, संघटनात्मक बळ आणि सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांचा प्रभाव यांच्या जोरावर प्रत्येक निवडणूक जिंकता येते, असा भ्रम निर्माण होतो. मात्र, मतदार प्रत्येक वेळी सत्ताधाऱ्यांच्या बाजूनेच उभा राहतो असे नाही, याची जाणीव राज्यातील विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीने महायुतीला करून दिली आहे. पाचही जागा जिंकण्याचे स्वप्न पाहणाऱ्या महायुतीला केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले. हा निकाल म्हणजे महायुतीच्या विजयाच्या मालिकेला लागलेला मिठाचा खडा आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप आणि महायुतीने सातत्याने आपला वरचष्मा राखला होता. त्यामुळे विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतही विजयाची पुनरावृत्ती होईल, असा सत्ताधाऱ्यांचा आत्मविश्वास होता. मात्र, या निवडणुकीचे राजकीय गणित वेगळे होते. महायुतीमध्ये काही ठिकाणी संयुक्तपणे निवडणूक लढविण्यात आली, तर काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतींच्या नावाखाली मित्रपक्षांनीच एकमेकांविरोधात उमेदवार उभे केले. दुसरीकडे महाविकास आघाडीतही सर्व काही आलबेल नव्हते. तेथेही एकजुटीचा अभाव होता आणि घटक पक्षांमध्ये मतभेद होते. असे असतानाही महायुतीला अपेक्षित यश मिळवता आले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसने प्रत्येकी दोन आणि एक जागा जिंकत सत्ताधाऱ्यांना जोरदार धक्का दिला.या निकालातील सर्वाधिक चर्चेचा विषय म्हणजे भाजपच्याचा नागपूरसारख्या बालेकिल्ल्यात झालेला पराभव. ज्या विदर्भात भाजपची संघटनात्मक ताकद मोठी मानली जाते, त्याच भागात मतदारांनी सत्ताधाऱ्यांना नाकारले. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचा उमेदवार विजयी झाला असला, तरी पुणे पदवीधर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने बाजी मारली. मराठवाडा पदवीधर मतदारसंघात सलग अठरा वर्षे आमदार म्हणून प्रतिनिधित्व करणारे सतीश चव्हाण यांनाही यावेळी पराभवाचा सामना करावा लागला. या निकालाने केवळ उमेदवारांचे राजकीय भवितव्य बदलले नाही, तर सत्ताधारी पक्षांच्या निवडणूक रणनीतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.मात्र, निकालाचे आत्मपरीक्षण करण्याऐवजी महायुतीमध्ये आता आरोप-प्रत्यारोपांचे रणकंदन सुरू झाले आहे. भाजपच्या नेत्यांनी आणि प्रवक्त्यांनी पत्रकार परिषदा घेऊन शिंदे गटाच्या शिवसेनेवर गंभीर आरोप केले. मित्रपक्षानेच केसाने गळा कापल्याचा आरोप करत पराभवाचे खापर दुसऱ्याच्या माथी फोडण्याचा प्रयत्न झाला. त्याला शिंदे गटाकडूनही जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले. पश्चिम महाराष्ट्रात पालकमंत्री असताना शंभूराज देसाई यांना पोलिसांनी फरफटत नेल्याच्या घटनेची आठवण करून देत शिंदे गटाने भाजपला जुन्या जखमांवर बोट ठेवण्यास भाग पाडले. म्हणजेच, निवडणुकीतील पराभवापेक्षा मित्रपक्षांमधील अविश्वास आणि संघर्षच आता अधिक उघड झाला आहे. वास्तविक, युती असो किंवा आघाडी, निवडणुकीच्या मैदानात एकमेकांविरोधात उमेदवार उभे केले जात असतील, तर त्याचे परिणाम भोगावेच लागतात. मैत्रीपूर्ण लढती हा शब्द वापरून राजकीय संघर्षाला मुलामा देता येत नाही. प्रत्येक पक्षाला आपले अस्तित्व आणि राजकीय ताकद दाखवायची असते. मात्र, अशा लढतींमध्ये मतांचे विभाजन होते आणि त्याचा फायदा विरोधकांना मिळतो. महायुतीच्या बाबतीतही असेच घडले आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. केवळ एकमेकांवर आरोप करून पराभवाची कारणे झाकता येणार नाहीत.पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतील मतदार हे सामान्य निवडणुकांतील मतदारांपेक्षा वेगळे असतात. शिक्षण, रोजगार, शिक्षकांचे प्रश्न, जुनी पेन्शन योजना, बेरोजगारी आणि शैक्षणिक धोरणे यांसारख्या विषयांबाबत त्यांच्या अपेक्षा असतात. सत्तेतील सहभागापेक्षा प्रश्नांची सोडवणूक आणि लोकप्रतिनिधींची उपलब्धता त्यांच्यासाठी अधिक महत्त्वाची असते. त्यामुळे या मतदारांनी दिलेला कौल हा केवळ राजकीय पक्षांच्या जय-पराजयापुरता मर्यादित समजणे चुकीचे ठरेल. सत्ताधाऱ्यांच्या कामकाजाबद्दलची नाराजीही या निकालातून व्यक्त झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.या निवडणुकीने महायुतीसमोर आत्मपरीक्षणाचे आव्हान उभे केले आहे. मित्रपक्षांमधील कुरघोड्या, जागावाटपातील विसंवाद आणि परस्परांवरील अविश्वास असेच सुरू राहिले, तर आगामी निवडणुकांमध्येही त्याची किंमत मोजावी लागू शकते. राजकारणात प्रत्येक विजय कायमचा नसतो आणि प्रत्येक पराभव हा आत्मपरीक्षणाची संधी असतो. पाच जागांचे स्वप्न पाहणाऱ्या महायुतीला दोन जागांवर समाधान मानावे लागले, हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर मतदारांनी दिलेला इशारा आहे. हा इशारा समजून घेण्याऐवजी मित्रपक्षांनी एकमेकांचे गळे धरण्यातच धन्यता मानली, तर महायुतीच्या एकजुटीचे पितळ आगामी काळात आणखी उघडे पडल्याशिवाय राहणार नाही. कारण मतदारांना सत्तेचा तमाशा नको आहे; त्यांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे हवी आहेत!

महापालिकेने पाणीपुरवठ्याचे नियोजन व्यवस्थित करावे!

ज्येष्ठ नागरिकांची मध्यरात्रीपर्यंत पाण्यासाठी प्रतीक्षा ;पाणी असूनही नागरिकांची तहान भागेना

नांदेड शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. शहरातील अनेक भागांत पाणीपुरवठ्याचे कोणतेही निश्चित वेळापत्रक नसल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. कधी सकाळी पाणी येते, तर कधी दुपारी किंवा रात्री उशिरा पाणी सोडले जाते. काही भागांत तर मध्यरात्री एक-दोन वाजेपर्यंत नागरिकांना पाण्याची वाट पाहत जागे राहावे लागते. विशेष म्हणजे, या परिस्थितीचा सर्वाधिक त्रास ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना सहन करावा लागत आहे. शहरात पाणी उपलब्ध असताना नागरिकांना मात्र पाण्यासाठी वणवण करावी लागत असेल, तर ही बाब निश्चितच चिंताजनक आहे.

माझे वय आज ८० वर्षे आहे. या वयात शरीराला विश्रांतीची गरज असते. मात्र, घरात पाणी येण्याची खात्री नसल्यामुळे रात्री उशिरापर्यंत जागे राहावे लागते. परवा रात्रीदेखील एक वाजेपर्यंत पाण्याची वाट पाहत बसलो; परंतु नळाला पाणी आलेच नाही. ही काही एक दिवसाची घटना नाही. अनेकदा असेच घडते. पाणी नेमके कधी येणार, किती वेळ येणार आणि कोणत्या भागात सोडले जाणार, याची कोणतीही स्पष्ट माहिती नागरिकांना दिली जात नाही. अशा परिस्थितीत वयोवृद्ध माणसांनी मध्यरात्रीपर्यंत जागे राहून पाण्याची प्रतीक्षा करणे कितपत योग्य आहे? महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी या प्रश्नाचा कधी गांभीर्याने विचार केला आहे का? पाणीपुरवठ्याबाबत तक्रार करण्यासाठी संबंधित विभागाला फोन केला, तर अनेकदा फोन उचलला जात नाही. फोन उचलला तरी समाधानकारक उत्तर मिळत नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, 'मी काय पाणी सोडणार आहे का?' अशा प्रकारची उद्धट उत्तरे मिळत असल्याचा अनुभव नागरिकांना येतो. एखादा ज्येष्ठ नागरिक आपल्या अडचणी सांगण्यासाठी अधिकाऱ्यांशी संपर्क साधतो, तेव्हा त्याला सहकार्य मिळण्याऐवजी अपमानास्पद वागणूक मिळत असेल, तर ही प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे. नागरिकांच्या करातून वेतन घेणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जनतेच्या प्रश्नांना उत्तर देण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. नांदेडकरांनी मोठ्या अपेक्षेने नव्या सत्ताधाऱ्यांना बहुमत दिले. शहरातील मूलभूत समस्या सुटतील, पाणीपुरवठा सुधारेल, रस्ते, स्वच्छता, ड्रेनेज आणि नागरी सुविधांमध्ये बदल होईल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली होती. मात्र, सत्तेत बदल झाला म्हणजे प्रशासनाच्या कार्यपद्धतीतही बदल होईल, असे नाही. प्रत्यक्षात नागरिकांना जुन्याच समस्यांचा सामना करावा लागत असेल, तर नव्या नेतृत्वाकडून अपेक्षा ठेवायच्या तरी कोणत्या? राजकीय पक्षांची नावे बदलली, चेहरे बदलले; पण सामान्य नागरिकांच्या समस्या तशाच राहिल्या, तर सत्तांतराचा उपयोग काय? निवडणुकीच्या काळात आश्वासनांची खैरात केली जाते; मात्र निवडून आल्यानंतर नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असेल, तर जनतेच्या नाराजीला सामोरे जाण्याची तयारीही सत्ताधाऱ्यांनी ठेवली पाहिजे.पाणी हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत प्रश्न आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा यांच्याइतकेच पाण्याचे महत्त्व आहे. माणसाला पिण्यासाठी, स्वयंपाकासाठी, स्वच्छतेसाठी आणि दैनंदिन जीवनातील प्रत्येक कामासाठी पाणी आवश्यक आहे. जनावरांनाही पाणी लागते. मात्र, शहरातील काही भागांत पाणी वाया जात असताना दुसरीकडे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. काही ठिकाणी नळ उघडे राहतात, पाइपलाइनमधून पाणी गळते, तर काही ठिकाणी अनधिकृत जोडण्या घेऊन मोठ्या प्रमाणात पाणी वापरले जाते. या प्रकारांवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा नेमकी काय करते, हा प्रश्न उपस्थित होतो. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने शहरातील प्रत्येक भागाचा प्रत्यक्ष सर्वेक्षण करून पाणी वितरणाची व्यवस्था तपासली पाहिजे. कोणत्या भागात किती पाणी सोडले जाते, कोणत्या भागात कमी दाबाने पाणी येते, कुठे पाइपलाइनला गळती आहे, कुठे अनधिकृत नळजोडण्या आहेत, याची माहिती संकलित करणे आवश्यक आहे. मुख्य जलवाहिनीपासून गल्लीबोळांपर्यंत पाणी समान दाबाने पोहोचते की नाही, याची तपासणी झाली पाहिजे. काही ठिकाणी मुख्य मार्गावर मोठ्या क्षमतेची पाइपलाइन असताना अंतर्गत वस्त्यांमध्ये अपुऱ्या क्षमतेच्या पाइपलाइनमुळे पाणी पोहोचत नाही. तर काही ठिकाणी गरज नसताना मोठ्या आकाराच्या पाइपलाइन टाकल्या जातात आणि ज्या वस्त्यांना पाण्याची अधिक गरज आहे, तेथे लहान पाइपलाइन असल्याने नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नाही. अशा विसंगती दूर करण्यासाठी तांत्रिक तपासणी आणि नियोजनबद्ध कामाची गरज आहे.पाणीचोरीचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. काही लोक स्वतःच्या सोयीनुसार कामगारांना बोलावून अनधिकृत नळजोडण्या घेतात. काही ठिकाणी बांधकामांसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर केला जातो. काही जण नियमबाह्य पद्धतीने पाणी उपसा करतात. अशा प्रकारांमुळे नियमित कर भरणाऱ्या आणि नियमांचे पालन करणाऱ्या सामान्य नागरिकांवर अन्याय होतो. महापालिकेने अनधिकृत नळजोडण्यांविरोधात कठोर मोहीम राबवली पाहिजे. पाणीचोरी करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. कोणाच्या दबावाखाली किंवा ओळखीच्या आधारावर नियम मोडणाऱ्यांना अभय मिळता कामा नये. कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे.

एकीकडे नागरिकांकडून वर्षभराचा पाणीकर वसूल केला जातो. मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि इतर कर नियमितपणे भरणाऱ्या नागरिकांना मात्र आवश्यक तेवढे पाणी मिळत नाही. मग नागरिकांनी कर का भरायचा? कर वसूल करताना महापालिका प्रशासन तत्पर असते; मात्र पाणीपुरवठा करण्याची वेळ आली की जबाबदारी झटकली जाते, अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण होत आहे. कर वसूल करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहेच; पण त्याबदल्यात आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. नागरिकांना वेळेवर आणि पुरेसे पाणी मिळत नसेल, तर त्याची जबाबदारी निश्चित कोणाची, याचे उत्तर प्रशासनाने दिले पाहिजे.शहरात टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा करणाऱ्या व्यवस्थेवरही नियंत्रण असणे आवश्यक आहे. पाणीपुरवठा विस्कळीत झाला की खासगी टँकरचालकांची मागणी वाढते. काही ठिकाणी नागरिकांना दोन हजार रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम मोजून टँकर मागवावा लागतो. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे, ते कदाचित टँकर विकत घेऊ शकतील; परंतु झोपडपट्टीत राहणाऱ्या आणि रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या गरीब कुटुंबांनी एवढे पैसे आणायचे कुठून? दोन वेळच्या अन्नाची भ्रांत असलेल्या कुटुंबाला दोन हजार रुपयांचा टँकर घेणे शक्य आहे का? पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी गरीब नागरिकांना आर्थिक संकटात ढकलणे योग्य नाही. त्यामुळे टँकर वितरणात पारदर्शकता, दरनियंत्रण आणि गरजू वस्त्यांना प्राधान्य देण्याची व्यवस्था असली पाहिजे. टँकर माफियांना पाणीटंचाईचा फायदा घेण्याची संधी मिळू नये. महापालिकेच्या अधिकृत टँकरचे वेळापत्रक

(काल्पनिक चित्र)

जाहीर करावे. कोणत्या भागात किती टँकर पाठवले, किती पाणी वितरित केले आणि कोणत्या नागरिकांना त्याचा लाभ झाला, याची नोंद ठेवावी. खासगी टँकरच्या दरांवरही नियंत्रण ठेवण्याबाबत प्रशासनाने विचार करावा. नागरिकांना पाणी मिळवण्यासाठी कोणाच्या दारात उभे राहण्याची वेळ येऊ नये. पाण्याचे वितरण ही सार्वजनिक जबाबदारी आहे, कोणाच्या वैयक्तिक कमाईचे साधन नाही.येत्या उन्हाळ्याचा विचार करता ही परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. उन्हाळ्यात पाण्याची मागणी वाढते. विहिरी, बोअरवेल आणि इतर जलस्रोतांची पाणीपातळी कमी होते. अशा वेळी महापालिकेने आतापासूनच नियोजन करणे आवश्यक आहे. विष्णुपुरी प्रकल्पासह उपलब्ध जलस्रोतांमधील पाण्याचा साठा, पाणीपुरवठ्याची क्षमता आणि भविष्यातील गरज यांचा अभ्यास करून कृती आराखडा तयार करावा. शहरातील प्रत्येक प्रभागाला किती पाणी आवश्यक आहे, त्यानुसार वितरणाचे वेळापत्रक निश्चित करावे. पाणी सोडण्याच्या वेळा नागरिकांना आधीच कळवाव्यात. वेळापत्रकात बदल झाल्यास त्याची माहिती संबंधित भागातील नागरिकांपर्यंत पोहोचवावी. त्यामुळे नागरिकांना विनाकारण रात्रभर जागे राहावे लागणार नाही. महापालिकेने प्रत्येक प्रभागात पाणीपुरवठ्याबाबत तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र संपर्क क्रमांक उपलब्ध करून द्यावा. तक्रारींची नोंद घेऊन त्यावर किती वेळात कार्यवाही झाली, याची माहिती नागरिकांना मिळाली पाहिजे. पाणीपुरवठा विभागात जबाबदार अधिकारी नियुक्त करावेत. संबंधित अधिकाऱ्यांनी नागरिकांचे फोन स्वीकारणे आणि तक्रारींचे निराकरण करणे बंधनकारक असावे. नागरिकांना उत्तर देताना नम्रता आणि संवेदनशीलता ठेवली पाहिजे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींना प्राधान्य देण्याची व्यवस्था असावी. प्रशासन हे जनतेसाठी आहे, जनता प्रशासनाच्या दारात विनवण्या करण्यासाठी नाही, हे प्रत्येक अधिकाऱ्याने लक्षात ठेवले पाहिजे.शहरात पाण्याची नासाडी रोखण्यासाठीही मोठ्या प्रमाणात जनजागृती आणि प्रत्यक्ष कारवाईची आवश्यकता आहे. सार्वजनिक नळ सुरू राहणे, पाइपलाइन फुटून पाणी रस्त्यावर वाहणे, बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर होणे, अशा प्रकारांकडे दुर्लक्ष होता कामा नये. पाणी वाया घालवणाऱ्यांवर कारवाई करावी. पाण्याच्या गळतीची माहिती देण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहन द्यावे. प्रत्येक प्रभागात नियमित पाहणी करणारी पथके नेमावीत. पाणीपुरवठ्याच्या यंत्रणेतील त्रुटी वेळेत दुरुस्त केल्या, तर मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होऊ शकते. दिवाळीसारखा सण जवळ आला आहे. प्रत्येक कुटुंबाला सण आनंदाने साजरा करायचा आहे. मात्र, घरात पाणीच नसेल, तर सणाचा आनंद कसा मिळणार? घरातील स्वयंपाक, साफसफाई, आंघोळ, पूजा आणि इतर कामांसाठी पाणी आवश्यक आहे. नागरिकांनी सणासुदीच्या काळातही पाण्यासाठी संघर्ष करावा, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. राजकीय नेते आणि पदाधिकाऱ्यांनी हारतुरे, सत्कार, स्वागत समारंभ आणि राजकीय कार्यक्रमांमध्ये वेळ घालवण्यापेक्षा नागरिकांच्या मूलभूत समस्यांकडे लक्ष द्यावे. विधानसभा, विधान परिषद, संसद किंवा इतर व्यासपीठांवर शहरातील पाणीप्रश्न मांडून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न करावेत.सत्ताधाऱ्यांनी केवळ राजकीय श्रेय घेण्यात किंवा एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात वेळ घालवू नये. काँग्रेस असो, भाजप असो किंवा अन्य कोणताही पक्ष असो, सामान्य नागरिकांच्या प्रश्नांबाबत सर्वांची जबाबदारी समान आहे. पक्ष बदलले, नेते बदलले, सत्ता बदलली; पण सामान्य माणसाचे जगणे बदलले नाही, तर त्या बदलाचा अर्थ काय? निवडणुकीच्या वेळी जनतेकडे मतांचा जोगवा मागणारे नेते निवडून आल्यानंतर जनतेच्या अडचणी विसरत असतील, तर ही लोकशाहीची शोकांतिका आहे. जनतेने दिलेला कौल हा केवळ सत्ता उपभोगण्यासाठी नसून जनतेची सेवा करण्यासाठी आहे, याची जाणीव लोकप्रतिनिधींनी ठेवली पाहिजे.

आज माझ्या घरात पाणी नाही. दोन हजार रुपयांचा टँकर विकत घेण्याची माझी आर्थिक परिस्थिती नाही. माझ्यासारख्या अनेक ज्येष्ठ नागरिकांची आणि गरीब कुटुंबांची हीच अवस्था आहे. एखाद्या घरात पाणी नसताना शेजारील भागात पाण्याची नासाडी होत असेल, तर त्यापेक्षा मोठे दुर्दैव कोणते? काही ठिकाणी नळांना भरपूर पाणी येते, तर काही ठिकाणी नागरिक थेंबाथेंबासाठी ताटकळत राहतात. ही विषमता दूर करणे महापालिकेचे कर्तव्य आहे. पाण्याचे समान आणि न्याय्य वितरण झाले पाहिजे. कोणाची ओळख, राजकीय वजन किंवा आर्थिक ताकद पाहून पाणीपुरवठ्याचे नियोजन होता कामा नये.मी हे सर्व प्रश्न कोणत्याही राजकीय द्वेषातून मांडत नाही. माझे वय ८० वर्षे आहे. या वयात मला कोणाकडून वैयक्तिक लाभाची अपेक्षा नाही. मात्र, माझ्यासह शहरातील सामान्य नागरिकांना सन्मानाने आणि वेळेवर पाणी मिळावे, एवढीच अपेक्षा आहे. गरीब, प्रामाणिक आणि नियमांचे पालन करणाऱ्या नागरिकांना पाण्यासाठी वनवास भोगावा लागू नये. प्रशासनाने नागरिकांच्या वेदना समजून घ्याव्यात. वातानुकूलित कार्यालयात बसून पाण्याची उपलब्धता आणि वितरण याबाबत कागदोपत्री आढावा घेण्यापेक्षा अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष वस्त्यांमध्ये जाऊन परिस्थिती पाहावी. रात्री एक-दोन वाजेपर्यंत पाण्याची वाट पाहणाऱ्या वृद्ध नागरिकांच्या घरापर्यंत जाऊन त्यांची अडचण समजून घ्यावी.

पाण्याचा प्रश्न आज दुर्लक्षित केला, तर उद्या तो अधिक गंभीर स्वरूप धारण करेल. त्यामुळे महापालिकेने तातडीने पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक निश्चित करावे, अनधिकृत नळजोडण्या बंद कराव्यात, पाणीगळती रोखावी, टँकर व्यवस्थेवर नियंत्रण ठेवावे, पाइपलाइनची दुरुस्ती करावी आणि प्रत्येक भागाला न्याय्य पाणीपुरवठा करावा. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारावी. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना प्राधान्य द्यावे.शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, पाणी हा राजकारणाचा विषय नसून जगण्याचा प्रश्न आहे. पाण्याशिवाय माणूस, जनावरे आणि संपूर्ण समाजाचे जीवन विस्कळीत होते. त्यामुळे महापालिकेतील सत्ताधारी, विरोधक, अधिकारी आणि कर्मचारी या सर्वांनी एकत्र येऊन या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढावा. नुसती आश्वासने, बैठका आणि सत्कार समारंभ नकोत; प्रत्यक्ष काम हवे. गरीबांच्या घरात पाणी पोहोचले पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांना मध्यरात्रीपर्यंत जागे राहण्याची वेळ येता कामा नये. पाणी वाया घालवणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे आणि पाण्याची चोरी करणाऱ्यांना आळा बसला पाहिजे. एका ८० वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकाची ही केवळ तक्रार नाही, तर संपूर्ण शहराच्या भवितव्याबद्दलची तळमळ आहे. आज आम्ही पाण्यासाठी आवाज उठवत आहोत; उद्या येणाऱ्या पिढ्यांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागू नये, हीच अपेक्षा आहे. महापालिकेने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात. अन्यथा पाणीटंचाईचा हा प्रश्न भविष्यात नांदेडकरांसाठी मोठे संकट ठरेल.

दत्तोपंत डहाळे
नांदेड.

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४३/२०२६
(CNR No.MHND10-001530-2026)

अर्जदार -

१	सुमन भ्र.गोविंद पांचाळ रा.बाचोटी ता.कंधार जि.नांदेड	वय-६५ वर्षे	धंदा-घरकाम
२	संगिता भ्र.गंगाधर वडला	वय-४५ वर्षे	धंदा-घरकाम
३	मनीषा भ्र.गजानन सुवर्णकार	वय-३९ वर्षे	धंदा-घरकाम
४	दुर्गा भ्र.संदिप पांचाळ	वय-३७ वर्षे	धंदा-घरकाम
५	कालिंदा पि.गोविंदराव पांचाळ	वय-३५ वर्षे	धंदा-घरकाम
६	सौ.अश्वीनी पि.गोविंदराव पांचाळ	वय-३५ वर्षे	धंदा-घरकाम
७	अश्वीनी भ्र.सुभाष पांचाळ रा.बाचोटी ता.कंधार जि.नांदेड हा.मु.तळणी ता.जि.नांदेड	वय-३६ वर्षे	धंदा-घरकाम
८	श्रीयांशी पि.सुभाष पांचाळ अ.पा.क्र.अर्जदार क्र.२ रा.बाचोटी ता.कंधार जि.नांदेड हा.मु.तळणी ता.जि.नांदेड	वय-५ वर्षे	

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती, अर्जदार २ ते ६ यांचे वडिल अर्जदार क्र.७ यांचे सासरे व अर्जदार क्र.८ यांचे आजोबा नामे गोविंद शंकरराव पांचाळ हे होते ते दिनांक २९/०५/२०२६ रोजी बाचोटी, ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. तसेच मयताची आई नामे सत्यभामाबाई शंकरराव पांचाळ ही यापुर्वीच मयत झाली आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की, गोविंद शंकरराव पांचाळ यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत गोविंद शंकरराव पांचाळ यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत गोविंद शंकरराव पांचाळ यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-०२/१२/२०२६

आज रोजी दि.२३/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-	स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक	**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय	सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार	क.स्तर,कंधार

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत रविवारी योगिक महासंमेलन

नांदेड/प्रतिनिधी-श्री विराट विश्वकर्मा बहुउद्देशीय संस्था अंतर्गत नांदेड योग सेवा समितीच्या वतीने रविवारी (दि.१ नोव्हेंबर) राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व १०८ श्री वेदांतचार्य दिगंबर स्वामी महाराज, वसमत यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदेड उत्तर विधानसभेचे आ.बालाजीराव कल्याणकर यांचे अध्यक्षतेखाली भव्य योगिक महासंमेलनाचे आयोजन योगाचार्य सिताराम गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ५ ते ८, अनिल लॉन्स निळा रोड नांदेड येथे आयोजित करण्यात आले आहे.

या महासंमेलनाचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असून संमेलनाचे अध्यक्षस्थानी उत्तर विधानसभेचे आ.बालाजीराव कल्याणकर हे असणार आहेत. या महासंमेलनास नांदेड परीक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप, स्वारातीर्थचे प्र कुलगुरु डॉ.अशोक महाजन, पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण शिवानंद महीनगिरे, मा.शिक्षण संचालक डॉ.गोविंद नांदेडे, आदर्श योग गुरु अरविंद जाधव, प्रजावाणीचे संपादक शंतनू डोईफोडे, दैनिक गोदातीरचे संपादक केशव घोणसे पाटील, नांदेड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष पांडागळे, प्रसिध्द उद्योजक अनिल शेटकार, चांदोजी पावडे, मंगल कार्यालयाचे संचालक नारायण चांदोजी पावडे, उद्योजक श्रेणिक नागडा तसेच उद्योजक भारत रामीणवारव इतर वरिष्ठ पत्रकार मंडळी, जिल्हा प्रतिनिधी कालिदास जहागीरदार, श्रीनिवास भोसले, प्रल्हाद कांबळे, शरद काटकर व इतर वरिष्ठ पत्रकार यांची उपस्थिती राहणार आहे.

दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा अपव्यय असणारी कामे प्रस्तावित करु नयेत-आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे

नांदेड/प्रतिनिधी-अलनिनोच्या प्रभावामुळे दुष्काळीजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यात येत आहे. काँक्रीट रस्ते, नाल्या आदी कामांसाठी पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होणार असल्यामुळे अशा कामांना वाढीव कालावधीत प्रशासकीय मान्यता देण्यात येवू नये, असा आदेशच महापालिकेचे आयुक्त डॉ.महेशुमार डोईफोडे यांनी गुरुवारी काढला आहे. त्यामुळे पाण्याचा अपव्यय होणाऱ्या कामांना येत्या ब्रेक लागणार आहे.

शासनाने खरिप हंगामातील ट्रिगर-१ लागू झाल्यामुळे कोरडा दुष्काळ जाहीर केला आहे. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची गरज सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने उपलब्ध जलसाठ्याचे धरणनिहाय व वापरनिहाय सुक्ष्म नियोजन करण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्याअनुषंगाने महापालिका क्षेत्रातील पाण्याचा अपव्यय होणाऱ्या कामांना कॉंक्रीट रस्ते, नाली बांधकाम आदींना सद्यःस्थितीत प्रस्तावित करण्यात येवू नयेत, असे आदेश आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी काढले असून ज्या कामांना पाण्याचा वापर होणार नाही अशी कामे करण्याचे देखील नमूद केले आहे, त्यामुळे पाण्याचा अपव्यय होणारी कामे करण्यावर प्रतिबंध लागणार आहे.

विधान परिषदेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या अभूतपूर्व यशाबद्दल महाविकास आघाडीच्या वतीने देगलूर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात फटाक्यांची भव्य आतषबाजी व हलगी वाजवून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बनावट सोने तारण ठेवून सुवर्णकाराला घातला १३ लाखांचा गंडा

अज्ञात महिला आरोपीसह तिघांवर गुन्हा

उमरखेड/प्रतिनिधी-शहरातील मध्यवर्ती असलेल्या सोनार लाईन परिसरात बनावट सोन्याचे देवशिक्के तारण ठेवून एका सराफा व्यावसायिकाला तब्बल १३ लाख रुपयांना गंडा घातल्याची खळबळजनक घटना उमरखेड शहरात घडली असून शिवा नावाच्या व्यक्तीसह एक महिला आणि त्यांच्या साथीदाराने ही चलाखी केल्याचे सुवर्णकाराने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

२८ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास शिवा नावाचा व्यक्ती दोन साथीदारांसह (एक महिला व एक पुरुष) उमरखेड येथील प्रसिद्ध के.एन. ज्वेलर्स या दुकानात आला. त्याने आपल्याकडे असलेले सोन्याचे देवशिक्के दाखवून तातडीने पैशांची गरज असल्याचे सांगितले.फिर्यादी कैलास उदावंत यांनी विश्वास ठेवून देवशिक्क्यांची सखोल शास्त्रीय तपासणी न करता १३ तोळे वजनाचे ११ देवशिक्के तारण म्हणून स्वीकारले आणि त्याबदल्यात आरोपींना १३ लाख रुपये रोख दिले.आरोपी निघून गेल्यानंतर उदावंत यांना संशय आल्याने त्यांनी सदर देवशिक्के मशीनवर तपासले. तपासणीत ते देवशिक्के सोन्याचे नसून पूर्णपणे बनावट असल्याचे स्पष्ट झाले.आपली फसगत झाल्याचे लक्षात येताच त्यांनी आरोपींनी दिलेल्या मोबाईल नंबर वर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र मोबाईल बंद आढळला. याबाबत सराफा व्यावसायिक कैलास नरहरी उदावंत वय ५५, रा. टिळक वार्ड, उमरखेड यांनी उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दि.२८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ९.३५ वाजता भारतीय न्याय संहितेच्या कलमान्वये गुन्हा नोंद केला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी गौरव कायंदे पाटील आणि पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे करीत आहेत.

आईच्या कुशीत परतली चिमुकली;पोलिस वर्दीतल्या माणुसकीचे कौतुक

देगलूर/प्रतिनिधी-आई नुकतीच बाळंत झालेली आणि नवजात बाळाच्या संगोपनात व्यस्त असताना खेळता खेळता घराबाहेर पडलेली अवघ्या तीन वर्षाची चिमुकली थेट मुख्य महामार्गावरील श्वास हॉस्पिटल परिसरात पोहोचली. अनोळखी ठिकाणी रडत फिरणाऱ्या या बालिकेला देगलूर पोलिसांनी तत्परतेने शोधून सुखरूप आईच्या कुशीत पोहोचविले. पोलिसांच्या या माणुसकीचे गुरुवार दि.२९ ऑक्टोंबर रोजी शहरभर कौतुक होत होते.

देगलूर शहरातील नाटकर गल्ली परिसरातील ही चिमुकली सकाळी दहा ते अकराच्या सुमारास खेळता खेळता घराबाहेर पडली. जुन्या बस स्थानक परिसरातील मदनुर नाकातील उदगीर रोडवरील श्वास हॉस्पिटल जवळ ती एकटीच रडत फिरत असल्याचे मेडिकल चालकाच्या लक्षात आले. त्यांनी महिला पोलीस जमादार रिहाना शेख यांना माहिती दिली. सुट्टीच्या दिवशीही रिहाना शेख यांनी तत्परतेने घटनास्थळी धाव घेतली. पो. कॉ. बोदमवाड यांच्या मदतीने चिमुकलीला पोलीस ठाण्यात आणण्यात आले. तीन वर्षाच्या बालिकेला स्वतःचा पत्ता सांगता येत नव्हता. आई-वडिलांबद्दल विचारल्यावर ती केवळ 'मम्मी-पप्पा'एवढेच सांगत होती. त्यामुळे तिच्या कुटुंबीयांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक वैभव पडवळ यांनी माहिती मिळताच तातडीने शोध मोहीम राबविण्याचे निर्देश दिले. महिला पो. कॉ. मंजुषा लघुळे, बळीराम घुले आणि वाहन चालक जावेद शेख यांच्या पथकाने पोलीस वाहनातून शहरातील विविध भागात शोध सुरू केला. ध्वनिक्षेपकाद्वारे नागरिकांना आव्हान करण्यात आले. अखेर नाटकर गल्ली परिसरात पोलीस वाहन पोहोचताच नागरिकांनी मुलीला ओळखले. कुटुंबीय तिचा शोध घेत होते. लघुळे यांनी चिमुकलेला सुखरूप आईच्या स्वाधीन केले. हरवलेली लेक पुन्हा कुशीत आल्याने आईच्या चेहऱ्यावर समाधान फुलले. प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक वैभव पडवळ यांचे मार्गदर्शन, जमादार रिहाना शेख यांची तत्परता, गणेश बोदमवाड यांचे सहकार्य आणि मंजुषा लघुळे, बळीराम घुळे व चालक जावेद शेख यांच्या पथकाची कामगिरी कौतुकास्पद ठरली. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या या कार्याला नागरिकाकडून मिळणारी कौतुकाची थाप या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाली. वर्दी केवळ कायद्याचे रक्षण करत नाही, तर संकटात सापडलेल्या चिमुकलीसाठी मायेचा आधारही बनते, याचा प्रत्यय देगलूर पोलीसांनी दिला. महिला पोलीस जमादार रिहाना शेख यांना गुरुवारी सुट्टी होती. त्या घरगुती कामानिमित्त बाजारात होत्या. या चिमुकली बाबत माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठले होते.

किशोरकुमार स्मृतीनिमित्त सदाबहार गीतांचा कार्यक्रम

नांदेड/प्रतिनिधी-येथील किशोरकुमार फॅन्स क्लब च्यावतीने किशोरकुमार यांच्या स्मृतीनिमित्त दि. ३१ ऑक्टोबर शनिवार रोजी सायंकाळी ६.३० वाजता कुसुम सभागृहात किशोरकुमार यांनी गायिलेल्या निवडक गीतांवर आधारित किशोरकुमार नोस्टालजीया गीतसंगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी प्रा. आर. के. देशपांडे यांचे बहुमोल मार्गदर्शन तर गायक रमेश मेगदे यांचे अभ्यासपूर्ण निवेदन लाभणार आहे. कार्यक्रमात प्रा.डॉ. प्रसाद जोशी, रमेश मेगदे, डॉ. सुधीर कुलकर्णी, डॉ. संदीप रायसोनी, डॉ. चंद्रशेखर किसवे, डॉ. सुशांत चौधरी, नितीन सेलमोकर, डॉ. विलास मुसळे, सौ. संगीता किन्हाळकर, सौ. रागिणी जोशी, डॉ.सौ. भाग्यश्री रायसोनी सुरेल गीते सादर करणार आहेत. कार्यक्रमात डॉ. राजेश तगडपल्लेवार, गणेश जगताप, सुधाकर बंडेवार, अशोक जोशी, कॅप्टन प्रकाश कस्तुरे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. प्रवेश विनामुल्य असून रसिक श्रोते बंधू-भगिनींनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३९९/२०२६
(CNR No.MHND10-001320-2026)

अर्जदार -

१ सुमनबाई भ्र.गणपत गोंटे वय-७५ वर्षे धंदा-घरकाम
२ बबनराव पि.गणपतराव गोंटे वय-४० वर्षे धंदा-शेती
३ साहेबराव पि.गणपत गोंटे वय-२७ वर्षे धंदा-शेती
वरील सर्व रा.मंगलसांगवी ता.कंधार जि.नांदेड
४ शोभाबाई सुभाष निलकंठे वय-४३ वर्षे धंदा-घरकाम
रा.कलंबर खु.ता.लोहा जि.नांदेड
५ संगीता भ्र.माधव तरटे वय-३५ वर्षे धंदा-घरकाम
रा.बोमनाळी ता.मुखेड जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारचे अर्जदार क्र.१ चे पती अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडिल नामे गणपत पि.नामदेव गोंटे हे होते ते दिनांक ०८/०७/२०२४ रोजी मंगलसांगवी ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. मयताची आई ही यापुर्वीच मयत झाली आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की, गणपत पि.नामदेव गोंटे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत गणपत पि.नामदेव गोंटे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत गणपत पि.नामदेव गोंटे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२७/११/२०२६

आज रोजी दि.१९/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/- **सहायक अधिक्षक** सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४२५/२०२६
(CNR No.MHND10-001464-2026)

अर्जदार -

१ केशव पि.माणिकराव कुकलवाड वय-५६ वर्षे धंदा-शेती
२ शेषिकला भ्र.पुंडलिक गडमवाड वय-५२ वर्षे धंदा-घरकाम
दोघे रा.संगुचीवाडी ता.कंधार जि.नांदेड
३ ज्ञानोबा पि.मानिक कुकलवाड वय-५० वर्षे धंदा-नौकरी
रा.संगुचीवाडी ता.कंधार जि.नांदेड
हा.मु.मानिक चौक शिंदे गाव, शिंदे,
नाशिक ता.जि.नाशिक

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराची क्र.१ ते ३ यांचे वडिल नामे मानिका महाजन कुकलवाड हे होते ते दिनांक १५/०७/२०२६ रोजी संगुचीवाडी ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदाराचे आई नामे कांताबाई भ्र.माणिकराव कुकलवाड ही होती ती दिनांक २०/०२/२०२४ रोजी मयत झाली आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की, मानिका महाजन कुकलवाड यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत मानिका महाजन कुकलवाड यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत मानिका महाजन कुकलवाड यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-०१/१२/२०२६

आज रोजी दि.२३/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/- **सहायक अधिक्षक** सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४३०/२०२६
(CNR No.MHND10-001530-2026)

अर्जदार -

१ सुमन भ्र.गोविंद पांचाळ वय-६५ वर्षे धंदा-घरकाम
रा.बाचोटी ता.कंधार जि.नांदेड
२ अश्वीनी भ्र.सुभाष पांचाळ वय-३६ वर्षे धंदा-घरकाम
रा.बाचोटी ता.कंधार जि.नांदेड
हा.मु.तळणी ता.जि.नांदेड
३ श्रीयांशी पि.सुभाष पांचाळ वय-५ वर्षे
अ.पा.क्र.अर्जदार क्र.२ रा.बाचोटी
ता.कंधार जि.नांदेड हा.मु.तळणी ता.जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराची क्र.१ यांचा मुलगा, अर्जदार क्र.२ यांचे पती व अर्जदार क्र.३ यांचे वडिल नामे सुभाष गोविंदराव पांचाळ हे होते ते दिनांक २७/०७/२०२६ रोजी बाचोटी, ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, सुभाष गोविंदराव पांचाळ यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत सुभाष गोविंदराव पांचाळ यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत सुभाष गोविंदराव पांचाळ यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-०२/१२/२०२६

आज रोजी दि.२३/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/- **सहायक अधिक्षक** सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३९७/२०२६
(CNR No.MHND10-001318-2026)

अर्जदार -

१ नमुनाबाई भ्र.बालाजी भागानगरे वय-५८ वर्षे धंदा-घरकाम
२ दत्ता पि.बालाजी भागानगरे वय-३५ वर्षे धंदा-शेती
३ अनिल पि.बालाजी भागानगरे वय-३२ वर्षे धंदा-शेती
वरील सर्व रा.नंदनवन
ता.कंधार जि.नांदेड
४ ज्योती भ्र.प्रवीण सिरसाठ वय-४७ वर्षे धंदा-घरकाम
रा.उमरा ता.लोहा जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारचे अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे बालाजी माणिका भागानगरे हे होते. ते दिनांक ०५/०२/२०२२ रोजी नंदनवन कंधार, ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, बालाजी माणिका भागानगरे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत बालाजी माणिका भागानगरे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत बालाजी माणिका भागानगरे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२७/११/२०२६

आज रोजी दि.१९/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/- **सहायक अधिक्षक** सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

वाडी बु.येथील रुग्णालयास पद्मश्रींचे नाव देण्यासाठी सर्व पक्षीय बैठक संपन्न

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरालगत असलेल्या वाडी बु. येथे नव्याने उभारण्यात आलेल्या शंभर खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयास पद्मश्री शामरावजी कदम यांचे नाव देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी सर्व पक्षीय नेते मंडळींची बैठक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आज (शुक्रवार) संपन्न झाली.

सर्वच पक्षाच्या नेते मंडळींनी वाडी येथील रूग्णालयास पद्मश्री कै.श्यामराव कदम यांचे नाव द्यावे, अशी एकमुखी मागणी केली. तसेच आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी यात पुढाकार घ्यावा, तर आ. बालाजीराव कल्याणकर यांनी हा प्रश्न मार्गी लावावा, असे मत बैठकीत व्यक्त करण्यात आले. या आयोजित केलेल्या बैठकीला आ. प्रताप पाटील चिखलीकर, खा. नागेश पाटील आष्टीकर, माजी मंत्री डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर, माजी आ. हनमंत पाटील बेटमोगरेकर, माजी आ. रोहिदास चव्हाण, राष्ट्रवादी शरदचंद्र पवारचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, शिवसेना उबाठाचे जिल्हाध्यक्ष भुजंग पाटील, बबन बारसे, हनमंतराव राजेगोरे, काँग्रेसचे शहराध्यक्ष गफार अब्दुल, आनंद चव्हाण, रंगनाथ वाघ, सुभाष कदम, नाना पोहरे, सत्यजित भोसले, नवल पोकर्णा, धनंजय सूर्यवंशी, दीपक पावडे, डॉ. हंसराज वैद्य, डॉ. संजय कदम, तानाजी हुस्सेकर, तातेराव पाटील आलेगावकर, भगवान ढगे, अरूण पोपळे, रमेश पावडे, संदीप तरोडकर, पंडित पवळे, विठ्ठल डक, अशोक गच्चे यांच्यासह आदीजणांची उपस्थिती होती.यावेळी आ. प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले की, पद्मश्री शामरावजी कदम यांचे सहकार क्षेत्रात मोठे योगदान होते. राज्यामध्ये उपजिल्हा रूग्णालयाला नानासाहेब, धर्माधिकारी अशा महान व्यक्तींची नावे दिली आहेत. त्यामुळे नांदेड वाडी येथील उपजिल्हा रूग्णालयास पद्मश्रींचे नाव द्यायला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, आरोग्यमंत्री आबिटकर, मेघनाताई बोर्डीकर यांची भेट घेणार आहे. पद्मश्रींचे नाव देण्यासाठी माझा पुढाकार आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच खा. नागेश पाटील आष्टीकर यांचाही पाठिंबा असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. माजी मंत्री माधवराव पाटील किन्हाळकर यांनीही पद्मश्रींचे नाव दिले पाहिजे, असे विस्तृत मत व्यक्त केले. माजी आ. हनमंत पा. बेटमोगरेकर, काँग्रेसचे गफार, शिवसेनेचे भुजंग पाटील, माजी आ. रोहिदास चव्हाण आदीजणांनी यावेळी मत व्यक्त केले.

निवडणूक निकालावरून महायुतीत ठिणगी;शिंदेंकडून 'मौन'चे आदेश

मुंबई/प्रतिनिधी-विधान परिषद निवडणुकीच्या निकालावरून भाजप आणि शिंदे सेनेत आरोप-प्रत्यारोप सुरू झाल्याने महायुतीतील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या नेते, प्रवक्ते आणि पदाधिकाऱ्यांना या विषयावर सार्वजनिकरीत्या भाष्य न करण्याचे आदेश दिले आहेत. वरिष्ठ पातळीवर याबाबत चर्चा होणार असल्याची माहिती शिवसेनेचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी दिली.

महायुतीतील मित्रपक्षांनी एकमेकांवर टीका करणे टाळावे. आम्ही युतीधर्म पाळत आलो आहोत. त्यामुळे दोस्तीमध्ये कुस्ती होऊ नये, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. भाजप आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांनीही शिवसेनेवर आरोप करू नयेत, असे आवाहन त्यांनी केले.भाजप नेते प्रवीण दरेकर यांच्या वक्तव्यांवर नाराजी व्यक्त करताना परांजपे म्हणाले की, महायुतीसाठी वापरली जाणारी भाषा योग्य नाही. मराठी शब्दांचा आमच्याकडेही मोठा साठा आहे; मात्र युती टिकवायची असल्याने आम्ही संयम बाळगत आहोत. दरेकर यांनी टीका करताना आपल्या मर्यादा ओलांडू नयेत, असा सूचक इशाराही त्यांनी दिला.

मांडवी येथील जुगार अड्डयावर पोलीसांची धाड;तीन जणांना अटक

मांडवी/प्रतिनिधी-मांडवी येथील जुगार अड्डयावर माहूर येथील पोलीस उपअधीक्षक किरण भोंडवे यांच्या आदेशावरुन पोलीस पथकाने गुरुवारी धाड टाकुन तीन जणांना अटक केली.

मांडवी बसस्थानकाजवळ जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती माहूरचे पोलीस उपअधीक्षक किरण भोंडवे यांना मिळाली. त्यांच्या आदेशावरुन पोलीसांच्या एका विशेष पथकाने बसस्थानकाजवळील श्रीनिवास फर्टीलायझर्सच्या बाजुला सुरु असलेल्या जुगार अड्डयावर गुरुवारी छापा टाकला. पैसे लावून जुगार खेळत असतांना संतोष नारायण कतुलवार (वय ४२) रा.मांडवी, आकाश सोमा मडावी (वय २९) रा.राजुरवाडी जि.आदिलाबाद, शेख गौस शेख अजिज (वय ४९) रा. मांडवी या तीघांना अटक केली. पोलीसांना बघुन इतर काही आरोपी पळून गेले आहेत. पोलीसांनी आरोपीकडून दोन मोबाईल व दुचाकी, रोख रक्कम, जुगाराचे साहित्य असा ४८ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी तीन जणांविरुध्द मांडवी पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एखादया कंत्राटदाराची काय 'पावर' असते, हे हदगाव शहरात पहावायास मिळते

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील जिल्हा परिषद हायस्कूलच्या व विद्यार्थ्यांच्या खेळाच्या मैदानावर अनेक दिवसापासून सिमेंट रोडच्या बांधकामासाठी वाळू, डस्ट, गिट्टी व सिमेंटचा साठा करण्यात आल्याने संताप व्यक्त होत आहे. मैदानाला गोदामाचे स्वरूप प्राप्त झाले आहे असून, धुळीचे साम्राज्य आणि अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे एक हजारांहून अधिक विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे, परिसरात दोन मुलींच्या शाळांसह जिल्हा परिषद हायस्कूल आहे. या प्रकरणी जि.प शाळेच्या मुख्याध्यापकांनी कोणत्या आधारावर मैदानात साहित्य ठेवण्याची परवानगी हे एक कोड्च असून याबाबत त्यांना विचारणा केली असता त्यांनी पण समाधानकारक उत्तर दिले नाही. तर जि.प.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनवर खान यांचेशी संपर्के केला असता त्यांनी या प्रकाराबाबत

माहिती नसल्याचे स्पष्ट केले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबधीत अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, मग मटेरियल कुठे ठेवायचे? असा उलट सवाल त्यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी चर्चा करतांना केल्याने ह्या गरीब विद्यार्थ्यांच्या आरोग्यापेक्षा कंत्राटदाराची सोय महत्त्वाची आहे का? असा सवाल सर्वसामान्य नागरिकात चर्चेला जात आहे. शाळेचे मैदान खासगी गोदामाप्रमाणे वापरण्याची परवानगी कोणी दिली?, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. अणखी विशेष म्हणजे जवळच उपजिल्हा रुग्णालय, नगरपरिषद आणि पोलीस ठाणे असतानाही या प्रकारावर कारवाई का होत नाही. यावरून हे स्पष्ट जाणवते की, सदर कँत्राटदार किती 'पावरफुल' आहे हे दिसून येते. प्रशासनाच्या अशा कार्यशैलीमुळे याबाबत हतबाल झालेल्या पालकात व नागरिकात नाराजी व्यक्त होत आहे.प्रशासानाने मैदानावरील बांधकाम साहित्य तातडीने हटवावे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना कराव्यात आणि साहित्य साठ्याला परवानगी देणाऱ्यांची चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. कारण या शाळेमध्ये सर्वसामान्य पालकांची मुले शिक्षण घेत आहेत याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

प्रा.डॉ.शुद्धोधन गायकवाड यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे रविवारी आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-बिलोली तालुक्यातील पानसरे महाविद्यालय अर्जापूर येथील पर्यवेक्षक प्रा. डॉ. शुद्धोधन गायकवाड हे प्रदीर्घ शैक्षणिक सेवेनंतर शनिवार, दि.३१ ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त त्यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०.३० वाजता पानसरे महाविद्यालय अर्जापूर येथे हा सोहळा संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पानसरे महाविद्यालयाचे सचिव सुभाष गायकवाड राहणार असून, नांदेडचे खासदार रविंद्र चव्हाण यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेसच्या मागासवर्गीय सेलचे राष्ट्रीय समन्वयक सुरेशदादा गायकवाड, कुंडलवाडी नगरपरिषदेच्या अध्यक्षा प्रेरणाताई कोटलावार, शिवराज पाटील होटाळकर, पंढरीनाथ दाचावार, नागनाथ पाटील सावळीकर, माधवराव पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. महादेव बेलखेडे, प्रा. डॉ. देवीदास जाधव यांची उपस्थिती राहणार आहे. प्रा. डॉ. शुद्धोधन गायकवाड यांनी आपल्या प्रदीर्घ अध्यापन सेवेतून अनेक विद्यार्थी घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संस्थात्मक योगदानाचा गौरव या सोहळ्याच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. याच कार्यक्रमात बुद्धिस्ट सोशल ऑर्गनायझेशन, नांदेड यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या इलगासुत या विशेष स्मरणिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

एका बिलासाठी १५ वेळा ओटिपी,तरी खात्यात रक्कम शून्यच

शालेय गणवेश पुरवठादार आर्थिक संकटात

> जून महिन्यात गणवेश वाटप होऊनही अद्याप अनेक व्यापाऱ्यांना पूर्ण रक्कम मिळालेली नाही. दुसऱ्या गणवेशाची रक्कम पीएफएमएस प्रणालीत अडकून पडली असून व्यापारी हवालदिल झाले आहेत.
>
> **-निलेश जैन,**जिल्हा सचिव,शिवसेना(उबाठा) व्यापारी संघटना

उमरखेड/प्रतिनिधी-राज्य शासनाच्या मोफत शालेय गणवेश वाटप योजनेत नव्याने लागू करण्यात आलेल्या चेकर मेकर प्रणालीमुळे यवतमाळ जिल्ह्यातील गणवेश पुरवठादार व्यापारी, मुख्याध्यापक आणि गटशिक्षणाधिकारी प्रचंड त्रस्त झाले आहेत. ही जाचक प्रणाली तात्काळ बंद करून पूर्वीची पीएफएमएस थेट पेमेंट प्रणाली पुन्हा सुरू करावी, अशी जोरदार मागणी व्यापारी महासंघाने केली आहे.

राज्य शासनाने विद्यार्थ्यांना दोन मोफत गणवेश देण्याची योजना सुरू केली आहे. पहिल्या गणवेशाचे वाटप जून महिन्यात झाले असले तरी, दुसऱ्या गणवेशाच्या पेमेंटसाठी शासनाने चेकर मेकर प्रणाली लागू केली आहे. या प्रणालीमुळे संपूर्ण यंत्रणाच कोलमडली असल्याचा आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे.एका बिलाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मुख्याध्यापकाला शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक स्वतः आणि पंचायत समिती स्तरावर अशा १५-१५ वेळा ओटिपी घ्यावा लागत आहे. एवढी किचकट प्रक्रिया पूर्ण करून रक्कम अपलोड केल्यानंतरही १५ ते २५ दिवसांपर्यंत व्यापाऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होत नसल्याचे चित्र आहे.शासनाची ही चेकर मेकर प्रणाली अत्यंत बोगस आहे. या प्रणालीमुळे भविष्यात कोणताही व्यवहार करणे शिक्षक आणि व्यापाऱ्यांना शक्य होणार नाही. याचा थेट फटका विद्यार्थ्यांना बसणार आहे, असे मत गणवेश पुरवठादार व्यापाऱ्यांनी व्यक्त केले.सध्या थोडीफार रक्कम खात्यात टाकून व्यापाऱ्यांना गणवेश पुरवठ्यासाठी बोलावले जात असल्याने व्यापारी वर्ग मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. अनेक मुख्याध्यापक आणि गटशिक्षणाधिकाऱ्यांनाही ही नवीन प्रणाली समजत नसल्याने कामे खोळंबली आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने याची गंभीर दखल घेऊन पंचायत समिती मार्फत थेट पैसे वर्ग करण्याची जुनी पीएफएमएस प्रणालीच पुन्हा सुरू करावी, अशी मागणी होत आहे.

एसआयआरला १३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ;अंतिम मतदार यादी ३० नोव्हेंबरला

नवी दिल्ली:मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाच्या प्रक्रियेत केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह सहा राज्यांच्या वेळापत्रकात बदल केला आहे. मतदार यादीतील नावांचा समावेश, वगळणे, पत्ता किंवा अन्य तपशिलांमधील त्रुटींबाबत दावे आणि आक्षेप दाखल करण्यासाठी महाराष्ट्रातील मतदारांना आता १३ नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. यापूर्वी ही मुदत २६ ऑक्टोबरपर्यंत होती. त्यामुळे मतदारांना आपली नोंदणी तपासून आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार आहे. अंतिम मतदार यादी ३० नोव्हेंबर रोजी प्रकाशित केली जाणार आहे.

निवडणूक आयोगाने गुरुवारी महाराष्ट्र, दिल्ली, आंध्र प्रदेश, हरियाणा, तेलंगणा आणि नागालँड या सहा राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या एसआयआर वेळापत्रकात सुधारणा जाहीर केली. संबंधित राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी मुदतवाढीची मागणी केल्यानंतर आयोगाने हा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात मतदारांकडून प्राप्त होणारे दावे आणि आक्षेप निकाली काढण्याची अंतिम मुदतही वाढविण्यात आली आहे. पूर्वी १० नोव्हेंबरपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करायची होती. आता २५ नोव्हेंबरपर्यंत दावे आणि आक्षेपांवर निर्णय घेतला जाणार आहे. त्यानंतर ३० नोव्हेंबर रोजी राज्याची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.राज्यात एसआयआर प्रक्रियेअंतर्गत ३१ ऑगस्ट रोजी मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यानंतर मतदारांना आपली नावे, पत्ते आणि अन्य तपशील तपासून त्रुटींबाबत हरकती नोंदविण्याची संधी देण्यात आली होती. मात्र, प्रक्रियेसाठी अधिक वेळ मिळावा, या मागणीनंतर आयोगाने सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे.

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३९८/२०२६
(CNR No.MHND10-001319-2026)

अर्जदार -

१ मनोहर पि.परबता चोंडे वय-५६ वर्षे धंदा-शेती
रा.खडक मांजरी,ता.लोहा जि.नांदेड

२ शिवाजी पि.परबता चोंडे वय-५० वर्षे धंदा-शेती
रा.काटकळंबा ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारचे अर्जदार क्र.१ व २ ची आई नामे सुमनबाई भ्र.परबता चोंडे ही होती ती दिनांक २९/११/२०१९ रोजी मयत झाली आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की, सुमनबाई भ्र.परबता चोंडे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत सुमनबाई भ्र.परबता चोंडे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत सुमनबाई भ्र.परबता चोंडे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२७/११/२०२६

आज रोजी दि.१९/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

CHANGE IN NAME

My (old name) is **KHAMRUNNISA BEGUM SAYYAD JILANI** which now I am changing as (new name) **Khamrunissa Begum Sayyad Jilani** Change Dete Of Birth 08/08/1952 Change Of Dete Of Birth 01/01/1945,

Husband Name -**Sayyad Jilani,**

Father Name - **Nabisab , Gulam Nabi**

Henceforth, my correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Signature:
Khamrunissa Begum Sayyad Jilani
Address: GHR
7-12 ,At Jumapeth Post Kandhar,
Tq. Kandhar, Kandhar DIST.Nanded
Maharashtra-431714
Mobile No : 9860067237

CHANGE IN NAME

My (old name) is **SAJIDA BEGUM M SHAIK IBRAHIM** which now I am, changing as (new name) **SAJIDA BEGUM MOHAMMAD SHAKEEL AHMAD**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
SAJIDA BEGUM MOHAMMAD SHAKEEL AHMAD
R/o 1-5-96, new Abadi galli no.4,Maqdum nagar
Nanded-431601
Mob.no. 9323626541

CHANGE IN NAME/SURNAME

My (old name) is **PATIL PRAVIN PRATAPRAO** which now I am, changing as (new name) **PRAVIN PRATAPRAO CHIKHALIKAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
PRAVIN PRATAPRAO CHIKHALIKAR
R/o H.no.108, At post Chikhali Tq. Kandhar
Dist. Nanded-431714
Mob.no. 9923154777

पान १ वरुन

गुन्हेगारांच्या पाच...

एम.के. जोगदंड (वय २४) रा.संघसेननगर व शेख मोबीन शेख गौस (वय २३) रा.खुदबेनगर, नांदेड या दोन गुन्हेगारांविरुध्द गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यांनाही एका वर्षासाठी हद्दपार करण्यात आले. विमानतळ पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगार विश्वास परमेश्वर शिंदे (वय २३) रा.विस्तारीत तथागतनगर,नांदेड, महेश बालाजी मुंडे (वय २२), सय्यद इम्रान स.चांद (वय २२) दोघे रा.शिवनगर, नांदेड या दोन गुन्हेगारांवर गंभीर स्वरुपाचे बारा गुन्हे दाखल आहेत. या दोघांनाही दोन वर्षासाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले. अर्धापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत जबरी चोरी, मारहाण करुन दहशत निर्माण करणे, धमकावणे या प्रकारचे गुन्हे करणाऱ्या दिगांबर अशोकराव मकरे (वय २९) रा.लहान, यशराज लक्ष्मण तुंगेवाड (वय २१), परमेश्वर गोविंद शिंदे (वय २०) रा.लहान, ता.अर्धापूर या तीघांनाही पोलीस अधिक्षकांनी एका वर्षासाठी हद्दपार केले आहे.

सोनाईनगर येथील कुंटणखान्यावर...

महेश राजू वाघमारे (वय २५) रा.चिखलवाडी, नांदेड या सहा जणांना अटक केली. कुंटणखान्यातून पोलीसांनी तीन महिलांची सुटका केली आहे. तीन्ही महिलांना पैशाचे आमिष दाखवून व बळजबरीने वेश्या व्यवसाय आरोपी करवुन घेत होते. घटनास्थळावरुन पोलीस पथकाने रोख रक्कम, मोबाईल, साहित्य असा ३४ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. याप्रकरणी सहा जणांविरुध्द भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाडी बु.येथील उपजिल्हा रुग्णालयाचे...

उपजिल्हा रुग्णालयाची मागणी आपण केली होती. आता रुग्णालयाची वास्तु पूर्ण झाली असून त्याचा लोकार्पण सोहळा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न होणार असल्याचे आ.बालाजी कल्याणकर यांनी सांगितले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी चारा वाटप, महिलांसाठी शिलाई मशिन व विद्यार्थ्यांसाठी ना.एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सायकल वाटप केले जाणार आहे. तसेच विविध रस्त्यांचे भूमीपुजन व लोकार्पण सोहळाही संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आ.बालाजी कल्याणकर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेला शिवसेनेचे संपर्कप्रमुख रमाकांत मडावी, आ.आनंदराव बोंढारकर, आ.बाबुराव कदम कोहळीकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील, गंगाधर बडूरे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४